**L. A. BILL No. I OF 2022.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENTS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 2017.

**सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १.**

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ९ मार्च २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ९ मार्च २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०१७ चा महा. ६१. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यात सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी २६१६ (२५५—३-२०२२)

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम १ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केलेला आहे), याच्या कलम १ मधील, पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— २०१७ चा महा. ६१.

"(३) (क) कलम ७ खेरीज करून, या अधिनियमाच्या तरतुदी, दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी नोकरीवर ठेवणाऱ्या आस्थापनांना लागू असतील.

(ख) कलमे ७ व ३६क यांच्या तरतुदी, दहापेक्षा कमी कर्मचारी नोकरीवर ठेवणाऱ्या आस्थापनांना लागू असतील.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम १७ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १७ मधील, खंड (छ) वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ यामध्ये नवीन कलम ३६क समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३६ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

नामफलक मराठीत असणे.

"**३६क.** (१) कलम ६ अन्वये नोंदणी केलेल्या प्रत्येक आस्थापनेचा किंवा ज्या आस्थापनेला कलम ७ लागू आहे त्या प्रत्येक आस्थापनेचा नामफलक, देवनागरी लिपीतील मराठी भाषेमध्ये असेल :

परंतु, अशा आस्थापनेच्या नियोक्त्याकडे, देवनागरी लिपीतील मराठी भाषेव्यतिरिक्त इतर कोणत्याही भाषेतील व लिपीतील नामफलक देखील असू शकतील :

परंतु आणखी असे की, मराठी भाषेतील अक्षरलेखन, नामफलकावर सुरुवातीलाच लिहिणे आवश्यक असेल आणि मराठी भाषेतील अक्षरांचा टंक आकार, इतर कोणत्याही भाषेतील अक्षरांच्या टंक आकारापेक्षा लहान असणार नाही.

(२) ज्या आस्थापनांमध्ये मद्य पुरविले जाते किंवा विकले जाते, अशी आस्थापना, नामफलकावर महान व्यक्तींची किंवा गड-किल्ल्यांची नावे लिहिणार नाही.".

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १.]**

**[महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. हसन मुश्रीफ,**
कामगार मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक ९ मार्च २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक ९ मार्च २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.